SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO

## अधिसूचना

गुरूवार, दि. ९ एप्रिल, २०१५

क्रमांक : ३२/२०१५ दिनांक : ०९/०४/२०१५

**विषय : नवीन अभ्यासक्रमाचे प्रथम संलग्निकरणामधील दुरुस्तीबाबत...**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, जगदंबा कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, आर्णी रोड, यवतमाळ या महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचे प्रथम संलग्निकरणासंदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल दि.१२.०२.२०१४ च्या विद्वत परीषदेने विषय क्र.७ अन्वये मान्य केल्यानुसार, त्याबाबतची अधिसूचना क्र. ६०/२०१४, दि.०८.०५.२०१४ प्रसिध्द करण्यात आली होती.

दि. १२.०२.२०१४ च्या विद्वत परिषदेच्या सभेचे कार्यवृत्त दि. २६.९.२०१४ च्या सभेत विषय क्र. ३८ अन्वये कायम करीत असतांना विषय क्र. ७ मधील अ. क्र. २ वरील महाविद्यालयातील अभ्यासक्रमामध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीचे अनुषंगाने अधिसूचना क्र.६०/२०१४, दि. ०८-०५-२०१४ मधील अ.क्र.२ वरील स्तंभ क्र.२ मधील जगदंबा कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, आर्णी रोड, यवतमाळ या महाविद्यालयाचे नांवासमोरील स्तंभ क्र.३ मधील अभ्यासक्रमामध्ये 'M.E. – IInd Shift 2. Mech. Engg.' ऐवजी ' M.E. – IInd Shift 2. Mech. Engg.(CAD/CAM)' अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसूचना

क्रमांकः ३३/२०१५ दिनांकः ९/०४/२०१५

**विषय : नि. चंद्रभागाबाई तायडे महाविद्यालय, अचलपूर जि. अमरावती या महाविद्यालयाचे संलग्नीकरण Withdraw करण्याबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, नि. चंद्रभागाबाई तायडे महाविद्यालय, अचलपूर जि. अमरावती हे महाविद्यालय बंद करण्यासंबंधी म.वि. कायदा १९९४ कलम ९१ नुसार संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून याबाबत विद्वत परीषदेच्या दि. २९.०९.२०१४ विषय क्र. ६० अन्वये या महाविद्यालयाचे संलग्निकरण पूर्णता काढून टाकण्याची, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेने केलेली शिफारस विद्वत परीषदेने मान्य केलेली होती. त्याअनुषंगाने पालीभाषा बहुउद्देशिय विकास सेवाभावी संस्था, अहमदपुर जि. लातूर (महाराष्ट्र) या संस्थेचे नि. चंद्रभागाबाई तायडे महाविद्यालय, अचलपूर जि. अमरावती या महाविद्यालयाचे संलग्नीकरण महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ९१ नुसार Withdraw करण्यात येत आहे.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ